# MAHARASHTRA PARAMEDICAL COUNCIL

(Constituted under MPC Act VI of 2016 Govt. of Maharashtra

Directorate, Medical education & Research Government Dental College & Hospital Building 4th Floor, St. George's Hospital Premises P. Dimela Rd. Fort. Mumbai 400001 Tel.: 091-22-2262061-65/22652251/57/59 Email : mpmcmumbai2017@gmail.com


दि : २८/१२/२०१८

महाराष्ट्र पॅरावैदक परिषद
४ था माळा सेंट जॉर्ज हॉस्पिटल पि डिमेलो रोड फोर्ट मुंबई १

## जाहिर सुचना

पॅरावैदक पदवी अथवा पदविकाधारक व्यावसायिक व्यक्ती तसेच पॅरा वैद्यकीय शिक्षण व प्रशिक्षण संबंधित अनधिकृत अभ्यासक्रमांच्या व पाठ्यक्रमां बाबत.

महाराष्ट्र पॅरावैदक परिषद व कायदा २०१६ हा राज्यात लागू झाला आहे. जे महाराष्ट्र राज्यात शासकिय मान्यता प्राप्त पॅरावैदक व्यावसायिक व्यक्ती म्हणून व्यवसाय वा सरकारी अथवा खाजगी आरोग्य सेवांशी निगडित संगठन, आरोग्य संस्था,प्रतिशठान , शासकिय निमशासकिय व खाजगी रुग्णालये येथे सेवा देत आहेत ( तंत्रज्ञ म्हणून काम करत आहेत) त्यांना सदर महाराष्ट्र पॅरावैदक परिषदेत नोंदणी करून सदर परिषदेचे नियम विनियम व कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहाणार आहे . सदर परिशदेच्या www.maharashtraparamedicalcouncil.org या संकेतस्थळावर सदर परिषद व कायद्याची माहिती उपलब्ध आहे. तेंव्हा सर्व पॅरावैदक व्यावसायिक व सेवा देणा-या पॅरावैदक व्यावसायिक व्यक्ती (तंत्रज्ञ) यांनी परिषदेकडे अॉन लाईन नोंदणी अर्ज पेरावैद्यक शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र व ईतर आवश्यक प्रमाणपत्रां सहित नोंदणी करणे अनिवार्य आहे. अन्यथा जे पॅरावैदक व्यावसायिक व्यक्ती परिषदेकडे नोंदणी करणार नाहीत त्यांचा व्यवसाय वा सेवा या अनधिकृत म्हणुन संबोधल्या जातिल व त्यांचेवर परिषदेतर्फे कायद्यातिल तरतुदिंप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल ते शिक्षेस पात्र राहातिल . तसेच शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,३ महापालिका मार्ग मुंबई १ यांच्या जाहिर सुचना डिजीआयपीआर २०१८-२०१९/५२९९ प्रमाणे उच्च व व्यवसाय शिक्षण यांच्या अनधिकृत संस्था प्रतिबंध अधिनियम २०१३ नुसार ज्या संस्था ह्या शासन मान्यताप्राप्त उच्च तंत्र शिक्षण संचालनालयातर्फे मान्यताप्राप्त नाहित वा महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त मंडळाच्या अथवा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ वा मान्यता प्राप्त विद्यापीठ यांच्या तर्फे मान्यता प्राप्त नसलेले पॅरामेडिकल व्यवसायाचे अनधिकृत अभ्यासक्रम चालवतात त्यातुन प्रवेश घेउन पदवी वा पदविका प्राप्त व्यक्ती यांना पॅरावैदक परिषदेत पॅरावैदक व्यावसायिक व्यक्ती म्हणुन नोंदणी करता येणार नाही. तशी पॅरावैदक परिषदेच्या कायद्यात व्यवस्था नाही. सदर अभ्यासक्रम हे अनधिकृत असुन यातुन दिल्या जाणाऱ्या पदवी वा पदविका या देखिल अनधिकृत आहेत याची नोंद घ्यावी. सदर बाबत शासनाचे संबंधित वैद्यकीय शिक्षण व संशोधन मंत्रालयाचे दिशा निर्देश परिषदेस पाळणे बंधनकारक राहील.

माहिती व तक्रार करण्यास खालिल नंबर वा ईमेल आयडी वर संपर्क वा तक्रार दाखल करावी.+912222620360
mpmcmumbai2017@gmail.com

महाराष्ट्र पॅरावैदक परिषद मुंबई

Scanned by CamScanner